# मतदारांसाठी संभाव्य दुबार यादीमध्ये नाव शोधण्यासाठी मार्गदर्शक सुचना

- मा.राज्य निवडणूक आयोगाच्या मतदार यादी विषयक कामकाजासाठी विकसीत करण्यात आलेल्या mahasecvoterlist.in या संकेतस्थळावरुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रारुप मतदार यादीतील "संभाव्य दुबार" मतदारांची यादी प्राप्त झाली आहे.
- या यादीमध्ये मतदाराचे नांव, आडनांव, वडील/पतीचे नांव, घर क्रमांक, वय, लिंग, EPIC क्रमांक, प्रारुप मतदार यादीमध्ये समाविष्ट केलेल्या प्रभागाचा क्रमांक व त्या प्रारुप मतदार यादीतील मतदाराचे नांव असणारा अनुक्रमांक इ. तपशील दिलेला आहे.
- मतदारांना तपशील शोधण्यास सुलभता होण्याच्या दृष्टीने समान नावाच्या मतदारांचा तपशील एकाखाली एक क्रमाने देण्यात आला आहे.
- मतदारांनी सदर यादीत ( pdf ) आपले नांव search (a) option वापरुन शोधावे. नाव शोधल्यानंतर समान नाव असणारे प्रकरणपरत्वे दोन, तीन अथवा चार अ.क्र. एका खालोखाल एक असे येतील.
- वरील अ.क्र.तील तपशील पडताळुन आपलेच नाव असल्याची खात्री करावी.
- आपलेच नाव असल्याची खात्री झाल्यानंतर आपल्या नावासमोरील प्रभाग क्रमांकापैकी कोणत्या प्रभागात आपणास मतदान करावयाचे आहे त्याचा विकल्प संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नमुन्यात भरावा. सदर नमुना अचुकरित्या भरुन त्यावर स्वाक्षरी करुन मनपा निवडणूक विभाग स्टेडीयम येथे लेखी स्वरुपात सादर करावा.

दिनांक

मा.प्राधिकृत अधिकारी (मतदार यादी)
तथा उपायुक्त (प्रशासन)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

विषय -: मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५
मतदान करावयाच्या प्रभागाचा विकल्प सादर करणे बाबत.

महोदय,

मी,-------------------------------------------------------------------- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दीतील मतदार असुन, मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रारुप मतदार यादीतील "संभाव्य दुबार" मतदारांच्या यादीत माझे नांव प्रभाग क्र.------------------- अशा एकापेक्षा अधिक प्रभागामध्ये समाविष्ट असल्याचे दर्शविण्यात आले आहे. उपरोक्त तपशिलाची पडताळणी मी स्वत: केली असुन, सदर तपशील योग्य असुन, माझाच आहे याची खात्री केली आहे. तरी मला प्रभाग क्र.-----------------मध्ये मतदान करावयाचे असुन तशी नोंद प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी/ मतदान केंद्रनिहाय मतदार यादीमध्ये घेण्यात यावी, ही विनंती.

मतदाराचे नांव :------------------------------------

EPIC क्र. :------------------------------------

पत्ता :------------------------------------

------------------------------------

------------------------------------